आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१३ ऑगस्ट २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या १५ पंचायत प्रतिनिधींना नवी दिल्लीत होणाऱ्या स्वातंत्र्यदिन सोहळ्याचं विशेष आमंत्रण

- इतर देशांच्या दबावाला बळी न पडता शेतकऱ्यांच्या हिताचे धाडसी निर्णय घेतल्याबद्दल देशभरातल्या शेतकऱ्यांनी मानले प्रधानमंत्र्यांचे आभार

- भारतीय वंशाच्या परदेशी नागरिकांना देण्यात येणाऱ्या परदेशी भारतीय कार्डाबाबत नियमांमध्ये बदल

**आणि**

- ठाण्याजवळ भिवंडी इथं सुमारे ३२ कोटीचे अंमली पदार्थ जप्त

**<><><><>**

देशातल्या २८ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून २१० पंचायत प्रतिनिधींना नवी दिल्लीत होणाऱ्या यंदाच्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

राज्यातल्या एकूण १५ जणांना ही संधी मिळाली आहे. यामध्ये गोंदिया जिल्ह्यातल्या भजेपारचे सरपंच चंद्रकुमार बहेकार यांचाही समावेश आहे. स्मार्ट ग्रामपंचायतीचा उपक्रम त्यांनी राबवला आहे.

आपापल्या गावात पायाभूत सुविधा, सार्वजनिक सेवा, आणि सामूहिक उपक्रम राबवून सुधारणा घडवणाऱ्या सरपंचांना विशेष पाहुणे म्हणून आमंत्रण देण्यात आलं आहे. यात महिला प्रतिनिधींची संख्या लक्षणीय आहे. हर घर नल जल योजना, प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना आणि इंद्रधनुष अभियानात या प्रतिनिधींनी भरीव कार्य केलं असल्याचं पंचायती राज मंत्रालयानं म्हटलं आहे.

या प्रतिनिधींचा उद्या एका विशेष कार्यक्रमात सत्कार करण्यात येणार असून ”आत्मनिर्भर भारत, विकसित भारत की पहचान” अशी यंदाची संकल्पना आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सभा सार या अप्लिकेशनचं उद्घाटनही यावेळी होईल.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१३ ऑगस्ट २०२५ - बुधवार

<><><><>

देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनाचं औचित्य साधून, तीनही सशस्त्र दलांनी तसंच तटरक्षक दल, केंद्रीय सशस्त्र पोलिस दल आणि राष्ट्रीय छात्र सेनेनं देशभरात १४२ ठिकाणी विशेष वाद्यवृंद सादरीकरणाचं आयोजन केलं आहे. स्वातंत्र्यसैनिकांच्या गौरवार्थ तसंच देशवासियांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत करण्यासाठी आणि ऑपरेशन सिंदूरचं यश साजरं करण्यासाठी १५ ऑगस्टला संध्याकाळी हे सादरीकरण केलं जाणार आहे. मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, गेटवे ऑफ इंडिया आणि हुतात्मा चौकात, पुण्यात शनिवारवाडा आणि गांधी राष्ट्रीय संग्रहालयाच्या परिसरात तसंच आणि नागपूरमध्ये दीक्षाभूमीवर हे सादरीकरण पाहता येईल.

<><><><>

हर घर तिरंगा अभियानाअंतर्गत आजपासून पुढचे तीन दिवस आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकावण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांच्या निवासस्थानी तिरंगा फडकावून या अभियानात सहभाग घेतला. हे अभियान आता लोकचळवळ बनली असून, ज्यामुळे देशात एकतेचा संदेश प्रसारित होत असल्याचं शहा यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात नमूद केलं.

या अभियानांतर्गत अनेक केंद्रीय मंत्री आणि राजकीय नेते आपल्या निवासस्थानी राष्ट्रध्वज फडकवून या देशभक्ती मोहिमेत सहभागी झाले. क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनीही दिल्लीत शासकीय निवासस्थानी तिरंगा फडकवून स्वातंत्र्य सैनिकांना आदरांजली अर्पण केली.

बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर मधे या अभियानाला प्रारंभ झाला.  सिद्धार्थ गार्डन इथल्या मराठवाडा मुक्ती संग्राम स्मारकाला अभिवादन करून सावे यांनी तिरंगा फडकावला. शहर भाजपातर्फे तिरंगा रॅली काढण्यात आली.

परभणी इथं जिल्हा प्रशासन, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आलं. विविध शाळा महाविद्यालयांमधले विद्यार्थी त्यात सहभागी झाले होते.

दरम्यान, हर घर तिरंगा अभियानाअंतर्गत इतरही अनेक उपक्रम राबवले जात आहेत. ठिकठिकाणी निघालेल्या तिरंगा फेऱ्यांमध्ये नागरीक उत्स्फुर्त सहभाग नोंदवत आहेत.

<><><>

व्यापार करारांबाबतच्या इतर देशांच्या दबावाला बळी न पडता शेतकऱ्यांच्या हितासाठी धाडसी निर्णय घेतल्याबद्दल देशभरातल्या शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. शेतकरी संघटनांचे नेते आणि शेतकरी यांनी काल केंद्रिय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांची भेट घेऊन कृतज्ञता व्यक्त केली. बनावट खतं आणि रसायनं उत्पादन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यासाठी नवे कायदे करणार असल्याचा पुनरुच्चार चौहान यांनी यावेळी केला. शेतकरी केवळ भारताचेच नाही तर जगाचे अन्नदाते आहेत. त्यांची सेवा म्हणजेच ईश्वराची सेवा असं चौहान म्हणाले.

देशाच्या विविध भागातून शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येनं मेळाव्याला उपस्थित होते.

<><><>

निवृत्तीवेतन धारकंच्या हयातीच्या दाखल्यांसाठी चौथी देशव्यापी डिजिटल मोहीम यंदा नोव्हेंबर महिन्यात आयोजित केली जाणार आहे. फेस ऑथेंटिकेशन म्हणजे चेहऱ्यावरुन ओळख पटवणे या तंत्रज्ञानाचा वापर करून निवृत्तीवेतनधारकांच्या डिजिटल सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित केली जाणारी ही आतापर्यंतची सर्वात मोठी मोहीम आहे. देशभरातल्या अठराशे पन्नासपेक्षा जास्त जिल्हे, शहरं आणि तालुक्यांमध्ये ही मोहीम राबवण्यात येणार असल्याची माहिती कार्मिक, सार्वजनिक गाऱ्हाणी आणि निवृत्ती वेतन मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात दिली आहे. दुर्गम भागातल्या निवृत्तीवेतन धारकांना जोडण्यासाठी निवृत्ती वेतन वितरण करणाऱ्या बँका, इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक, निवृत्ती वेतन धारक कल्याण संघटना, रेल्वे अशा संस्थांच्या सहकार्याने ही मोहीम राबवली जात आहे.

<><><>

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची आज पुण्यतिथी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यादेवी होळकर यांना आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशातून अभिवादन केलं आहे. कुशल प्रशासक, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना स्मृतिदिनी त्रिवार

वंदन असं मुख्यमंत्री आपल्या संदेशात म्हणाले आहेत. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या समाज माध्यमावर 'अहिल्यादेवी या कर्तृत्व, नेतृत्व आणि दातृत्वाचं मूर्तिमंत प्रतीक होत्या. त्यांचं सेवाभावानं ओतप्रोत असं सामाजिक परिवर्तनाचं अतुलनीय कार्य आजही प्रेरणादायी आहे', अशा शब्दात अहिल्यादेवींना अभिवादन केलं आहे. अत्यंत कुशल प्रशासक, उत्तम संघटक, न्यायप्रिय आणि दूरदृष्टी असलेल्या लोक कल्याणकारी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी प्रणाम अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे.

<><><>

भारतीय वंशाच्या परदेशी नागरिकांना देण्यात येणाऱ्या परदेशी भारतीय कार्डाबाबत नियमांमध्ये केंद्रीय गृहमंत्रालयाने काही सुधारणा केल्या आहेत. एखाद्या ओसीआय नागरिकाला दोन वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त तुरुंगवासाची शिक्षा झाली असेल किंवा सात वर्षांपेक्षा जास्त तुरुंगवासाच्या शिक्षेसाठी आरोपपत्र दाखल झालं असेल तर त्या व्यक्तीचं परदेशस्थ नागरिकत्व रद्द केलं जाईल असं मंत्रालयानं म्हटलं आहे. गेल्या काही वर्षांमधे ओसीआय कार्डधारक नागरिकांचा गुन्ह्यांमध्ये अथवा देशविरोधी कारवायांमध्ये सहभाग असल्याचं आढळून आल्यानंतर गृह मंत्रालयानं नियमांमध्ये सुधारणा केल्या आहेत.

<><><>

साड्यांची महाराणी म्हणून ओळखली जाणारी महाराष्ट्राची पैठणी आता लंडनच्या व्हिक्टोरिया अल्बर्ट संग्रहालयात प्रदर्शित होणार आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार सध्या लंडन दौऱ्यावर असून, त्यांनी तिथल्या संग्रहालयाला भेट दिल्यानंतर काल संचालकांसोबत झालेल्या चर्चेत हा निर्णय घेण्यात आला.

<><><>

दहिहंडी उत्सवात सहभागी होणाऱ्या गोविंदांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वसई विरार महानगर पालिकेने ६ हजार ६५२ गोविंदांचा विमा काढला आहे. विमा अर्ज सादर केल्याच्या तारखेपासून ते १७ ऑगस्टपर्यंत हा विमा लागू असेल. विम्याचं संरक्षण मिळालं असलं तरी उत्सवाच्या ठिकाणी आयोजकांनी सुरक्षेच्या सर्व उपाययोजना कराव्यात, दुखापत होऊ नये याची दक्षता घेण्याचं आवाहन महानगरपालिकेकडून करण्यात आलं आहे.

<><><><>

दादरच्या कबुतरखाना बंदीच्या समर्थनार्थ मराठी एकीकरण समितीच्या वतीनं आज जोरदार आंदोलन करण्यात आलं. दादर इथं कबुतरखाना परिसरात मोठ्या संख्येने कार्यकर्ते जमले होते. यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. पोलिसांनी यावेळी काही आंदोलकांना ताब्यात घेतलं आहे. स्थानिक नागरिकांनीही या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिसरातील दुकानं दुपारी एकपर्यंत बंद ठेवण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कबुतरखाना बंदिस्त करण्यात आल्यानंतर जैन समाजाकडून आक्रमक भूमिका घेण्यात आली होती. त्यानंतर मराठी एकीकरण समितीनं बंदीच्या समर्थनार्थ आंदोलनाची हाक दिली होती.

<><><><>

ठाणे जिल्ह्यात भिवंडी बायपासवर ठाणे पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ जप्त केले. गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून तनवीर दोन  आंतरराज्य ड्रग्ज तस्करांना अटक केली. त्यांच्याकडून सुमारे ३२ कोटी रुपयांच्या अंमली पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. आज त्यांना न्यायालयात हजर करण्यात येत आहे.

<><><><>

अमेरिकेतल्या नेब्रास्का विद्यापीठ आणि भुवनेश्वर इथल्या भारतीय तंत्रज्ञान संस्थेतल्या शास्त्रज्ञांनी अहिल्यानगर जिल्ह्यात हिवरे बाजार पाणलोट क्षेत्राला भेट देऊन प्रकल्प कार्यपद्धतीचा अभ्यास केला. या अभ्यासगटानं  पद्मश्री पोपटराव पवार यांची भेट घेऊन नैसर्गिक संसाधनांचं व्यवस्थापन, पाणलोट क्षेत्र विकास आणि ग्रामविकासात हिवरे बाजारच्या कार्याबद्दल चर्चा केली.

//<><><><>//